महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

शुक्रवार ■ ०२ जानेवारी २०२६ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १८७ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

## संपादकीय

### लोकसेवेच्या नावाखाली? स्वार्थाची खेळी

राजकारणात विचारधारा, निष्ठा आणि जनतेप्रती जबाबदारी या मूल्यांना मोठे महत्त्व असते. मात्र अलीकडच्या काळात अनेक नेते हे मूल्य बाजूला ठेवून केवळ स्वार्थासाठी वेळेनुसार पक्ष बदलताना दिसत आहेत. सत्ता, पद, तिकीट किंवा वैयक्तिक फायद्यासाठी घेतलेले हे निर्णय लोकशाहीसाठी चिंताजनक आहेत. कालपर्यंत ज्या पक्षावर टीका केली जात होती, आज त्याच पक्षात प्रवेश केला जातो; आणि उद्या गरज पडली तर पुन्हा दुसऱ्या झेंड्याखाली उभे राहण्यासही मागेपुढे पाहिले जात नाही. या 'राजकीय स्थलांतरामुळे' जनतेचा विश्वास डळमळीत होतो. मतदारांनी दिलेल्या कौलाचा असा अवमान होत असेल, तर लोकशाहीची मुळं कमकुवत होण्याचा धोका निर्माण होतो. जे नेते आपले मूल्य आणि ध्येय ठाम ठेवतात, तेच समाजात आदर्श बनतात. वेळेनुसार पक्ष बदलणारे नेते मात्र फक्त "सत्ता टिकवण्याचे साधन" बनले आहेत. पक्ष बदलणे हा प्रत्येकाचा अधिकार असू शकतो, पण तो निर्णय वैचारिक मतभेद, धोरणात्मक फरक किंवा जनहितासाठी घेतला जातो का, याची पारदर्शकता असणे गरजेचे आहे. केवळ स्वतःच्या राजकीय भवितव्यासाठी घेतलेले निर्णय हे लोकसेवेच्या संकल्पनेला छेद देणारे ठरतात. आज गरज आहे ती राजकीय निष्ठेची, सातत्याची आणि जबाबदारीची. जनता सर्व काही पाहते आणि योग्य वेळी त्याचा निर्णयही घेते. फक्त स्वार्थासाठी वेळेनुसार पक्ष बदलण्याची सवय राजकीय कारकिर्दीसह लोकशाहीवरही घातक परिणाम करणारी ठरते. जर राजकारणाला समाजाचा आदर हवा असेल, तर स्वार्थाच्या खेळाडूंना आता निवडणुकीत जागा नको. अशा नेत्यांमुळे राजकारणाची स्थिरता धोक्यात येते, जनतेचा विश्वास घटतो आणि लोकशाहीच्या मूल्यांना धक्का बसतो. जे नेते आपले ध्येय, मूल्ये आणि तत्त्वे ठाम ठेवतात, तेच समाजात आदर्श निर्माण करतात. वेळेनुसार पक्ष बदलणारे नेते मात्र फक्त "सत्ता साधने" म्हणून दिसतात, ज्यामुळे राजकारण फक्त स्वार्थाचे खेळ बनते. जनतेने या वर्तनाला स्पष्ट संदेश द्यावा. निवडणुकीत विचारपूर्वक निर्णय घ्यावा, पारदर्शकतेस प्राधान्य द्यावे, आणि मूल्यांवर टिकलेले नेते ओळखावेत. राजकारण ही लोकसेवा असावी, स्वार्थाचे साधन नाही; शेवटी, टिकणारी प्रतिष्ठा ही नेत्याच्या प्रामाणिकपणावर अवलंबून असते, आणि वेळेनुसार पक्ष बदलणारे नेते त्या प्रतिष्ठेला कायमस्वरूपी नुकसान पोचवतात, इतकं मात्र खरं !!

# भाजपनं मारला बिनविरोध विजयाचा 'पंच!'

## डोंबिवली प्रभाग क्रमांक २४ ब मधून ज्योती पाटील ; तर २७ अ मधून मंदा पाटील यांची बिनविरोध निवड

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली - कल्याण डोंबिवली पालिका निवडणुकीसाठी भाजपकडून उमेदवारी अर्ज भरलेल्या उमेदवारांना अधिक संख्येने बिनविरोध निवडून आणून भाजप प्रदेशाध्यक्षांच्या गावात भाजपने बिनविरोधाची बाजी मारली असल्याचे चित्र भाजप पदाधिकारी, कार्यकर्त्यांना राज्याला दाखवून द्यायचे आहे. या व्यूहरचनेतून काम करत असलेल्या भाजप पदाधिकाऱ्यांनी



भाजपची आतापर्यंत पाच जागांवर बिनविरोध विजयाची घोडदौड

गुरूवारी मंदा पाटील, ज्योती पाटील या दोन महिला भाजप उमेदवारांना बिनविरोध निवडून आणले. या दोन उमेदवारांच्या बिनविरोध निवडीमुळे भाजपमधून बिनविरोध निवडून आलेल्या एकूण उमेदवारांची संख्या पाच झाली आहे. बुधवारी दिवसभरात रेखा चौधरी, आसावरी नवरे, रंजना पेणकर या भाजपच्या उमेदवार विविध प्रभाग पॅनलमधून भाजप पदाधिकऱ्यांनी प्रयत्न करून बिनविरोध निवडून आणल्या. गुरूवारी अशाच प्रकारचे प्रयत्न करून भाजप पदाधिकाऱ्यांनी डोंबिवली पश्चिमेतून प्रभाग क्रमांक २४ ब मधून ज्योती पवन पाटील, डोंबिवली पूर्वेतील प्रभाग क्रमांक २७ अ मधून मंदा सुभाष पाटील यांना बिनविरोध निवडून आणले. मंदा पाटील या नुकत्याच मनसेतून भाजपमध्ये दाखल झाल्या आहेत. त्यांना अंधारात ठेऊन मनसे स्थानिक नेत्यांनी त्यांचे महिला जिल्हाध्यक्ष पद काढून घेतले होते. त्यामुळे नाराज मंदा पाटील यांनी भाजपमध्ये प्रवेश केला होता.

भाजप पदाधिकाऱ्यांनी डोंबिवलीतील अधिकाधिक प्रभागांमधील भाजपचे उमेदवार बिनविरोध निवडून येतील यादृष्टीने प्रयत्न सुरू केले आहेत. डोंबिवलीतून भाजपचे किमान दहा किंवा त्याहून अधिक उमेदवार बिनविरोध निवडून येतील यादृष्टीने आम्ही प्रयत्न करत आहोत, असे भाजप पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

डोंबिवली पश्चिमेत दोन मातब्बर उमेदवारांच्या प्रभागातील निवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी भाजपचे स्थानिक पदाधिकारी प्रयत्नशील आहेत. कल्याणमध्येही स्थानिक पदाधिकारी यादृष्टीने प्रयत्न करत आहेत. डोंबिवलीत पक्षीय उमेदवारांविरूध्द उमेदवारी अर्ज भरणाऱ्या अपक्ष उमेदवारांची संख्या कमी आहे. विविध पक्षीय आघाड्या, सामाजिक संस्थांचे पदाधिकारी अपक्ष म्हणून निवडणूक रिंगणात आहेत. स्थानिक पक्षीय उमेदवारांशी त्यांचे स्नेहाचे संबंध पान ३ वर ▶▶▶

# शिवसेनेचाही डंका, 4 उमेदवार बिनविरोध

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण डोंबिवलीमध्ये शिवसेनेचा डंका पाहायला मिळाला. कारण, शिवसेनेचे 3 उमेदवार बिनविरोध विजयी ठरले. खासदार डॉ. श्रीकांत शिंदेंची खेळी यशस्वी ठरली. पॅनेल क्र. 24 मधून रमेश म्हात्रे, विश्वनाथ राणे, वृषाली रणजित जोशी यांची बिनविरोध निवड झाली. तर प्रभाग क्रमांक 28 अ मधून हर्षल राजेश मोरे यांची बिनविरोध निवड झाली आहे. आमदार राजेश मोरे यांचे ते चिरंजीव आहेत. येथील सर्व अपक्ष उमेदवारांनी उमेदवारी अर्ज मागे घेतल्यानंतर ह्या निवडणुका बिनविरोध झाल्या आहेत. सर्व अपक्ष उमेदवारांनी माघार घेतल्याने शिवसेनेचा भगवा फडकला आहे. दरम्यान, महायुतीच्या राज्यातील आणखी काही महापालिकेत विजयाचा झेंडा फडकला आहे. त्यामध्ये, भाजपने केडीएमसीत 5, धुळे महापालिकेत 2, पनवेल 1 आणि भिवंडी महापालिकेत 1 जागा बिनविरोध करत, राज्यात 9 जागांवर बिनविरोध उमेदवार विजयी केले आहेत. तर, शिवसेनेने केडीएमसीत 4, जळगावात एक जागा बिनविरोध केल्याने, राज्यात 5 जागा बिनविरोध झाल्या आहेत.

## भिवंडीत भाजप उमेदवार बिनविरोध

भिवंडी महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने विजयाचे खाते उघडले आहे.प्रभाग समिती क्रमांक 17 ब मधील भाजपा उमेदवार माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांचे पुतणे सुमित पुरुषोत्तम पाटील हे बिनविरोध निवडून आले आहेत. मान सरोवर येथील निवासस्थानी विजय जल्लोष साजरा करीत असतानाच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी फोन करून सुमित पाटील व माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांचे अभिनंदन करीत हा विजय भिवंडीतील विजयाची नांदी ठरेल अशा शुभेच्छा दिल्या आहेत.विशेष म्हणजे २४ वर्षांच्या दरम्यान झालेल्या चार निवडणुकीत कोणीही बिनविरोध विजयी झाला नव्हता तो विक्रम भाजपाचे सुमित पाटील यांनी पाचव्या सार्वत्रिक निवडणुकीत केला आहे.



# सत्ता स्थापनेसाठी अंबरनाथमध्ये खलबते

## आमदार किणीकरांची चव्हाणांसोबत बैठक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथ :** अंबरनाथ नगर परिषदेत शिंदेंच्या शिवसेनेला नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत पराभव स्विकारावा लागल्यानंतर आता शिवसेना आणि भाजप युतीसाठी हालचाली सुरू झाल्या आहेत. गुरूवारी स्थानिक शिवसेना आमदार डॉ. बालाजी किणीकर यांनी भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांची भेट घेतली. त्यावेळी युतीबाबत चर्चा झाली असल्याची माहिती आमदार किणीकरांनी दिली. तर काँग्रेसही भाजपसोबत युतीची चाचपणी करत असल्याची माहिती आहे. भाजपही शिवसेनेसोबत युतीसाठी तयार आहे मात्र वाळेकरांना बाजूला ठेवून युती करावी, यासाठी भाजप आग्रही आहे. त्यामुळे आता शिंदेंच शिवसेना काय निर्णय घेते हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

अंबरनाथ नगर परिषदेच्या निवडणुकीत भाजपने शिंदेंच्या शिवसेनेला नगराध्यक्ष पदाच्या स्पर्धेत धुळ चारली. भाजपच्या तेजश्री करंजुले नगराध्यक्ष पदी विराजमान झाल्या. भाजपला नगराध्यक्ष पदावर संधी मिळाली असली अंबरनाथमध्ये शिवसेना (शिंदें) पक्षाला सर्वाधिक २७ जागा मिळाल्या. त्यामुळे उपनगराध्यक्ष पदासह पालिकेचा कारभार विनाव्यत्यय चालवण्यासाठी भाजपला इतर पक्षांसोबत जुळवून घ्यावे लागणार आहे.

# उल्हासनगर निवडणुकीत 28 अर्ज बाद !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर :** उल्हासनगर महापालिका निवडणुकांच्या अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी मोठ्या प्रमाणावर बंडखोरे, पक्षप्रवेश आणि उमेदवारांची धावाधाव पाहायला मिळाली. एकूण ७८ जागांसाठी होणाऱ्या निवडणुकीसाठी तब्बल ७०२ उमेदवारांनी आपले अर्ज दाखल केले होते. त्यानंतर झालेल्या छाणणी प्रक्रियेनंतर २८ उमेदवारांचे अर्ज बाद ठरले आहेत. त्यामुळे उल्हासनगर महापालिका निवडणुकींच्या रिंगणात सध्या ६७४ उमेदवार शिल्लक राहिले आहेत. २ डिसेंबर रोजी अर्ज मागे घेण्याच्या दिवसानंतर अंतिम उमेदवार निश्चित होतील. त्यानंतर कोणत्या प्रभागात बंडखोरी राहिली आणि कुठे बंडखोर थंड झाले ते स्पष्ट होणार आहे. उल्हासनगर महापालिकेच्या ७८ जागांसाठी १५ जानेवारी रोजी मतदान संपन्न होणार आहे.




| प्रभाग क्रमांक | दाखल अर्ज | बाद अर्ज | वैध अर्ज |
|---|---|---|---|
| १ ते ३ | ११८ | १३ | १०५ |
| ४ ते ६ | ७९ | ०१ | ७८ |
| ७ ते ९ | १०४ | ०३ | ०१ |
| १० ते १२ | १२२ | ० | १२२ |
| १३ ते १६ | ११० | ० | ११० |
| १७ ते २० | १६९ | ११ | १५६ |

उल्हासनगर महापालिकेत गेल्या निवडणुकीत भाजपने मित्रपक्षांच्या जोरावर अडीच वर्ष सत्ता उपभोगली. त्यानंतर फुट पडल्याने शिवसेनेला सत्तेची संधी मिळाली. मात्र २०२२ नंतर निवडणूक झालेली नाही. त्यामुळे यंदा उमेदवारांमध्ये मोठ्या प्रमाणावर उत्साह पाहायला मिळाला.

शहरात यंदा शिंदेंची शिवसेना भाजपच्या विरोधात रिंगणात असून शिवसेनेच्या सोबत साई पक्ष आणि कलानी गट निवडणूक लढत आहे. तर दुसरीकडे शिवसेना ठाकरे गटासोबत मनसे आणि काँग्रेस निवडणुकीच्या रिंगणात आहेत. रिपाई, बहुजन समाज पार्टी, अजित पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, आम आदमी पार्टी, वंचित बहुजन आघाडी आणि अपक्ष रिंगणात आहेत. अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत एकूण ७०२ उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले होते.

त्यानंतर झालेल्या छाणणी प्रक्रियेत एकूण २८ अर्ज बाद ठरल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी दिली आहे. यातील तपशील मिळाले नसले तरी सध्या एकूण ६७४ वैध उमेदवार रिंगणात आहेत. शुक्रवारी अर्ज मागे घेण्याची मुदत संपणार आहे. त्यानंतरच लढतींचे चित्र स्पष्ट होणार आहे.

# 99 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला सुरुवात

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला आज साताऱ्यात सुरुवात झाली. साहित्य महामंडळाचे अध्यक्ष मिलिंद जोशी आणि मावळत्या अध्यक्ष डॉक्टर तारा भवाळकर यांच्या हस्ते ध्वजारोहण, तसंच ग्रंथप्रदर्शनाचं उद्घाटन झालं. संमेलनाचं औपचारिक उद्घाटन उद्या ज्येष्ठ साहित्यिक, विचारवंत डॉक्टर मृदुला गर्ग यांच्या हस्ते होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, मराठी भाषा मंत्री उदय सामंत, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. तारा भवाळकर, संमेलनाचे नियोजित अध्यक्ष ज्येष्ठ लेखक विश्वास पाटील समारंभाला उपस्थित राहतील. उद्घाटन सोहळयाला संमेलनाचे स्वागताध्यक्ष आणि राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले हेही प्रमुख उपस्थित होते. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या ७५० व्या जयंती वर्षानिमित्त आणि संत तुकोबारायांच्या स्मृतिवर्षानिमित्त 'बहुरूपी भारूड' या सांस्कृतिक कार्यक्रमाने उद्घाटन सोहला थोड्याच वेळात सुरु होणार आहे. चार दिवस चालणाऱ्या या भव्य साहित्य संमेलनात विचारमंथन, काव्यवाचन आणि सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून मराठी साहित्यविश्व एकत्र येत आहे.



## महत्वाचे



### कल्याण: अल्पवयीन मुलाच्या अपहरणा प्रकरणी चौघांना अटक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याणमधे एका अल्पवयीन मुलाची फसवणूक करून त्याचं खंडणीसाठी अपहरण करणाऱ्या चौघांना पोलिसांनी अटक केली आहे. आरोपींनी समाज माध्यमावर एका तरुणीच्या नावाचं बनावट खातं तयार करून या मुलाशी मैत्री केली. प्रेमसंबंधांचा आभास निर्माण करून त्याचा विश्वास संपादन केला आणि त्याला कल्याणमध्ये नांदिवली भागात भेटायला बोलवलं. मात्र, प्रत्यक्ष भेट झाल्यानंतर त्याचं अपहरण करून त्याच्या पालकांकडे २० लाख रुपयांची खंडणी मागितली. मुलाच्या पालकांनी केलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी माग काढत या मुलाची सुटका केली आणि आरोपींना अटक केली.

### "उमेदवारी नसली तरी जनसेवा कायम" - आशुतोष म्हस्के

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** - 'ठाणे महापालिकेच्या निवडणुकीसाठी मला उमेदवारी मिळाली नसली तरी मी नेहमी जनसेवा करीत राहिल' असे भावनिक वक्तव्य आशुतोष म्हस्के यांनी त्यांच्या समाजमाध्यमावर प्रसारित केलेल्या पत्राच्या माध्यमातून केले आहे. आशुतोष म्हस्के यांचे हे भावनिक पत्र समाजमाध्यमांवर प्रचंड वायरल होत आहे. ठाणे महानगरपालिकेच्या निवडणुकीत तिकीट मिळालं नाही. त्या सगळ्या माझ्या प्रभागातील नागरिकांसाठी आशुतोष यांनी समाजमाध्यमाच्या मार्फत भावनिक पत्र लिहिले आहे. 'मला उमेदवारी मिळाली नसल्यामुळे प्रभागातील लोकांची फारच निराशा झाली आहे. परंतु पक्ष स्तरावरच्या अडचणी वेगळ्या असतात. शिंदे साहेबांचाही काहीतरी नाईलाज झाला असेल. शेवटी कुटुंबातल्या हट्टी मुलांचं लगेच ऐकलं जातं. समंजस मुलाला बरेचदा माघार घ्यावी लागते तसंच काहीसं झालं असेल म्हणूनच माझी तिकीट नाकारली असेल' असे या पत्रात आशुतोष यांनी लिहिले आहे.

# 29 महापालिकांच्या निवडणुकांसाठी राज्यभरातून 33 हजार 606 अर्ज दाखल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
(वार्ताहर)

दि. 1/मुंबई : राज्यातल्या 29 महानगर पालिकांच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्जांची काल छाननी झाली. त्यानंतर राज्य निवडणूक आयोगानं 29 महानगरपालिकांमध्ये दाखल झालेल्या एकंदर उमेदवारी अर्जांबाबत माहिती दिली. त्यानुसार राज्यातील 29 महानगरपालिकांच्या एकंदर 893 प्रभागांमधून 2 हजार 869 जागांसाठी 33 हजार 606 उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले आहेत. उद्या म्हणजे 2 जानेवारीला दुपारी 3 वाजेपर्यंत अर्ज मागे घेता येतील.

3 जानेवारीला निवडणूक चिन्हाचं वाटप झाल्यानतर अंतिम उमेदवार यादी जाहीर होणार आहे. येत्या 15 जानेवारीला मतदान आणि 16 जानेवारीला मतमोजणी होणार आहे. दरम्यान धुळे आणि कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत भारतीय जनता पार्टीच्या प्रत्येकी दोन उमेदवारांची बिनविरोध निवड निश्चित झाली आहे.

# नाशिक-सोलापूर-अक्कलकोट महामार्गाला केंद्राची मंजुरी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

नाशिक-सोलापूर-अक्कलकोट या सहापदरी महामार्गाला केंद्रीय मंत्रिमंडळानं काल मंजुरी दिली. 374 किलोमीटर लांबीच्या या महामार्गासाठी 19 हजार 142 कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. हा ग्रीनफिल्ड मार्ग वाढवण बंदराजवळ दिल्ली-मुंबई महामार्गाला, नाशिकमध्ये राष्ट्रीय महामार्गावर आग्रा-मुंबई कॉरिडॉरला आणि पांगरी इथं समृद्धी महामार्गाला जोडण्याचं प्रस्तावित आहे. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. यामुळे प्रवासाचा 17 तासांचा वेळ वाचणार असून 201 किलोमीटर अंतर कमी होण्याची अपेक्षा आहे. नाशिक- अक्कलकोट मार्गामुळे औद्योगिक परिसरात येणाऱ्या -जाणाऱ्या मालाची दळणवळण क्षमता वृद्धिंगत होणार आहे.




# राज्यासह देशभरात नववर्षाचं जल्लोशात स्वागत

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबईत गेटवे ऑफ इंडिया, मरीन ड्राइव्ह, गिरगाव, दादर, जुहू चौपाटी, आणि इतर सार्वजनिक ठिकाणी नागरिकांनी एकत्र येऊन मोठ्या जल्लोषात नववर्षाचं स्वागत केलं. नव्या वर्षाच्या पहाटे आज मुंबईत पावसानं हजेरी लावली. त्यामुळे वातावरणात गारवा पसरला. राज्यातल्या विविध भागातही नागरिकांनी नववर्षाचं स्वागत केलं. नंदुरबारमधे श्रॉफ हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी सामूहिक सूर्यनमस्कार करून नवीन वर्षाचं स्वागत केलं.**



गोंदियामधे नववर्षाची सुरुवात देवदर्शनानं केली. नागरा धाम मंदिरातील पंचमुखी शिवलिंगाच्या दर्शनासाठी तसंच सिव्हिल लाईन भागातल्या हनुमानाचं दर्शन घेण्यासाठी सकाळपासून भाविकांची मोठी रांग लागली होती. गोवा, मध्य प्रदेश, तेलंगणामध्ये स्थानिक नागरिकांनी आणि पर्यटकांनी फटाक्यांची आतषबाजी केली. अमृतसरमध्ये श्री हरमंदिर साहिबमध्ये नव्या वर्षाचं स्वागत प्रार्थनेनं झालं. काश्मीर खोऱ्यात काल नववर्षाचं स्वागत मोठ्या उत्साहात झालं. गुलमर्ग, पहलगाम, सोनमर्ग आणि इतर पर्यटन स्थळांवर तसंच श्रीनगरमध्ये लाल चौक इथल्या ऐतिहासिक क्लॉक टॉवरजवळही नागरिकांनी एकत्र येऊन नववर्षाचं स्वागत मोठ्या जल्लोषात केलं. यावेळी शहरात, प्रमुख रस्त्यांवर आणि पर्यटन स्थळांवर बहू-स्तरीय सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली होती.

**राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागरिकांना नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.**



# कल्याणातील प्रार्थनास्थळे ठरली शिक्षण व समाजकल्याणाची केंद्रे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



**कल्याण** : मशीदींकडे सहसा फक्त प्रार्थनास्थळे म्हणून पाहिले जाते, परंतु इतिहास साक्षी आहे की या संस्था नेहमीच शैक्षणिक, सामाजिक आणि कल्याणकारी क्रियाकलापांचे केंद्र राहिल्या आहेत. आजच्या काळातही जर मशीदींना याच व्यापक भूमिकेत सक्रिय केले, तर समाजात मोठे सकारात्मक बदल घडून येऊ शकतात.

कल्याण शहरातील दोन मशीदी याची उत्तम उदाहरणे बनली आहेत. येथील जबाबदार व्यक्तींनी 'स्टडी सेंटर' (अभ्यास केंद्र) सुरू करून केवळ शैक्षणिक मदतच दिली नाही, तर वैद्यकीय आणि जनकल्याणाची कामेही नियमितपणे केली जात आहेत. या केंद्रांचा लाभ आतापर्यंत शेकडो विद्यार्थ्यांनी आणि महिलांनी घेतला आहे.

कल्याणमधील दारुल फलाह आणि दारुल सलाम या दोन मशीदी सध्या केवळ प्रार्थनास्थळे नसून स्थानिक लोकांसाठी शिक्षण, तंत्रज्ञान, आरोग्य आणि समाजकल्याणाची महत्त्वाची केंद्रे बनली आहेत. गोविंदवाडी येथील 'दारुल फलाह' मशीदीचे जबाबदार शब्बीर मेमन यांनी 'नवराष्ट्र'च्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले की, दीड वर्षापूर्वी मशीदीच्या पहिल्या मजल्यावर ट्यूशन, कॉम्प्युटर, मेहंदी आणि शिलाई क्लास सुरू करण्यात आले होते. सुरुवातीला शिक्षकांच्या पगारासाठी विद्यार्थ्यांकडून फक्त २०० रुपये फी घेतली जात असे. परंतु, परिसरातील कष्टकरी आणि अल्प उत्पन्न गटातील कुटुंबांसाठी ही किरकोळ फी देखील ओझे ठरत होती. ही परिस्थिती पाहून मशीद प्रशासनाने १ जानेवारीपासून सर्व क्लासेस पूर्णपणे मोफत करण्याचा निर्णय घेतला आहे.

शब्बीर मेमन यांच्या मते, हे सर्व क्लासेस संध्याकाळी ४ ते रात्री १० वाजेपर्यंत सुरू असतात. मशीदीमध्ये आधीपासूनच होमिओपॅथी क्लिनिक आणि सरकारी कागदपत्रे बनवून देण्याची सुविधा विनामूल्य उपलब्ध आहे, ज्याचा लाभ परिसरातील डझनभर कुटुंबे घेत आहेत.

अशाच प्रकारे बैल बाजार येथील 'दारुल सलाम' मशीदीचे रफिक इक्बाल सय्यद आणि नूर इक्बाल सय्यद यांनीही मशीदीच्या पहिल्या मजल्यावर वैद्यकीय आणि शैक्षणिक केंद्र स्थापन केले आहे. अलीकडेच येथे १२ दिवसांचा 'एआय ट्रेनिंग कोर्स' (AI Training Course) आयोजित करण्यात आला होता, ज्यामध्ये ३० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. तरुणांना आधुनिक तंत्रज्ञान आणि भविष्यातील डिजिटल गरजांची ओळख करून देण्याच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# नववर्ष स्वागतापूर्वी पेण पोलिसांचा दणका

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : ३१ डिसेंबर व नवीन वर्षाच्या स्वागताच्या पार्श्वभूमीवर पेण शहर व उपनगरांत शांतता व वाहतूक शिस्त राखण्यासाठी पेण पोलिसांनी कडक बंदोबस्त व नाकाबंदी राबवली. उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या नेतृत्वाखाली व पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

खोपोली बायपास, जुना पेट्रोल पंप, नगरपालिका नाका, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, पाम रोड व बोरगाव परिसरात नाकाबंदी करून सुमारे २५० ते ३०० वाहनांची तपासणी करण्यात आली. नियमभंग करणाऱ्या १०३ वाहनचालकांवर कारवाई करून ८३,५०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. BNS अन्वये २८५ नुसार २ केसेस (सार्वजनिक मार्गावर अडथळा निर्माण करणे किंवा धोक्यात टाकणे). मद्यपी वाहनचालक (मोवाका १८५) मद्यधुंद अवस्थेत वाहन चालवणाऱ्या एका चालकावर कारवाई. तगडा पोलीस बंदोबस्त तैनात शांतता आणि सुव्यवस्था राखण्यासाठी पेण पोलीस ठाण्याने मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळ रस्त्यावर उतरवले होते. या बंदोबस्तामध्ये ०८ पोलीस अधिकारी, ५४ पोलीस अंमलदार, ०८ होमगार्ड, ०५ वाहतूक पोलीस कर्मचारी यांनी रात्रभर गस्त घालून परिस्थितीवर नियंत्रण ठेवले. पोलिसांच्या या तत्परतेमुळे पेण शहरात नवीन वर्षाचे स्वागत शांततेत पार पडले. नियम मोडणाऱ्यांवर करण्यात आलेल्या या कठोर कारवाईमुळे बेशिस्त चालकांचे धाबे दणाणले आहेत.

# सावध व्हावे आता

कॅलेंडरचे पान बदलले, म्हणजे आयुष्य बदलत नाही,
पाश्चात्य अंधानुकरणाने, आपली संस्कृती उरत नाही.
मध्यरात्रीचा तो जल्लोष, अन् मद्यधुंद तो थाट,
सांगा बरं, हीच का आपल्या, प्रगतीची नवी वाट?
फटाक्यांचा तो आवाज, अन् धुराचे लोट नभी,
पर्यावरणाची हानी करून, सुख लाभेल का कधी?
हॅलो-हायच्या नादात आपण, 'नमस्कारा'ला विसरलो,
उसन्या घेतलेल्या सणांमध्ये, आपण स्वतःलाच हरवलो.
संस्कृती आपली महान आहे, गुढीपाडव्याचा तो सण,
निसर्गाशी नाते सांगणारे, चैत्र पालवीचे ते क्षण.
इंग्रजी तारखांच्या चक्रात, अडकून पडलो आहोत आपण,
खऱ्या सणांच्या मांगल्याला, मुकलो आहोत आपण.
नको तो दिखावा, नको ती व्यसनांची साथ,
येणाऱ्या वर्षात धरूया, माणुसकीचा हात.
नव्या वर्षाचे स्वागत करू, विचारांच्या प्रकाशात,
अंधानुकरण सोडून देऊ, जगूया आपल्या रुबाबात.

# मुरबाडमधील कार्डधारकांचे दोन महिन्यांचे धान्य गायब ?

## चौकशी करून कडक कारवाईची संतप्त महिलांची मागणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता




**मुरबाड** : केंद्र सरकार नागरिकांना अंत्योदय, पिवळी शिधापत्रिका व प्राधान्य शिधापत्रिका धारकांना राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेतून मोफत धान्य पुरविले जात आहे. याचा फायदा देशातील 70% नागरिकांना होत आहे. परंतु याच नागरिकांच्या मोफत धान्यावर डल्ला मारण्याचे काम मुरबाड शहर व ग्रामिण भागातील अनेक रास्तभाव दुकानदार करत असल्याचे अनेकदा समोर आले आहे.

मुरबाड शहरामधील सुद्धा असाच प्रकार समोर आला असून शहरातील माता नगर, सोनारपाडा व नागाचाखडक येथिल कार्डधारकांना गेले दोन महिने धान्य मिळाले नसून सतत दुकाने इतरत्र हलविले जात असल्याचा आरोप करत वेळेवर कधीच धान्य मिळत नसल्यामुळे सध्या देविचीआळी येथे असणारे दुकान नेहमी बंद असल्याची तक्रार या भागातील शेकडो महिलांनी मुरबाड पुरवठा विभागाकडे केली आहे. शिवाय आम्हाला धान्य का मिळत नाही याची विचारणा केली असता तुम्ही तहसीलदारांना विचारा असे उद्धट उत्तरे सदर दुकानदाराने या महिलांना दिले आहे.

यामुळे त्रस्त व संतप्त झालेल्या महिलांनी मुरबाड नगरपंचायत प्रभाग क्रमांक 9 च्या नगरसेविका सौ. रविना विनायक राव व समाजसेवक विनायक राव यांच्या नेतृत्वात पुरवठा अधिकारी मुरबाड यांना या दुकानदारा विरोधात लेखी तक्रार देऊन कारवाईची मागणी केली आहे. आम्हाला आमच्याच विभागात दुकान चालू करावे व आम्हाला नियमित धान्य मिळावे अशी मागणी पुरवठा अधिकारी संयोगिता पवार यांच्याकडे केली आहे.

दरम्यान शासनाने गरिबांसाठी पुरवलेले मोफत धान्य जर दुकानदार परस्पर हडप करत असतील किंवा अपराथापर करत असतील अशा दुकानदारांची चौकशी करून त्यांचे परवाने रद्द करावेत अशी मागणी शहरातील नागरिक करत असून पुरवठा विभागाचे अधिकारी करतात काय असा संतप्त सवाल मुरबाडकर करत आहेत.

# लोकसेवक पाच वर्षात कोट्याधीश कसे बनतात ?

## न उलगडणारे कोडे - सी.आर.म्हात्रे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : लोकशाहीत सत्ताधीश हे जनतेचे सेवक असतात असा घटनात्मक संकेत आहे.मात्र आजची वास्तविक परस्थिती पहिली तर हे सेवक पाच वर्षात कोट्याधीश कसे होतात हे न उलगडणारे कोडे आहे. निवडणुकी अगोदर सर्व साधारण उत्पन्न असणारी व्यक्ती या त्याच्या कार्यकाळात संपत्ती वाढीचे कारण काय?ही योगायोगाची गोष्ट नक्कीच नाही हा सत्तेचा परीस स्पर्श आहे. सत्तेच्या हा परीस स्पर्श निवडणुकीत प्रतिज्ञा पत्रात खूप गरिबीत असतो ,अगदी नगण्य ,मात्र सत्तेच्या या पाच वर्षात बहुतांश प्रतिनिधी या खुर्चीच्या परीस स्पर्शाने त्यांची जमीन खरेदी,बंगले, फार्म हाऊस,कंपनीतील भागीदारी,शेअर्स,बँक ठेवी, यांची वाढ गुणाकार पद्धतीने होते.हे अजबच म्हणावे लागेल .हे प्रतिनिधी, लग्झरी जीवन जगतात. मात्र सामान्य माणूस आयुष्यभर कष्ट करतो,राबराब राबतो, तो जेमतेम मूलभूत गरजच पूर्ण करतो ,मात्र सत्ताधीश हे पाचच वर्षात कित्येक पिढ्यांची सोय करतात. असे पेण वाशी खारेपाटातील सामाजिक कार्यकर्ते सी आर म्हात्रे यांनी सांगितले.

निवडणूक फंडा लोकशाहीचा मुखवटा.वास्तविक निवडणूक ही लोकशाहीची खरी कसोटी असायला हवी पण प्रत्यक्षात ती गुंतवणुकीची योजना बनली आहे.कोटी कोटी रुपये खर्च करून निवडणूक लढविली जाते. कारण सत्ता म्हणजे परतावा देण्याची खास योजना आहे हा ठाम विश्वास निर्माण झाला आहे. ठेके ,निधी ,परवानग्या, जमिनी व्यवहार,खनिजे, CSR, शासकीय खरेदी व्यवहार,नवीन प्रकल्प या प्रत्येक ठिकाणी सत्ता आपले नेटवर्क उभे करते. निवडणुकीत झालेला खर्च वसूल या प्रकारे होत असते,मात्र सर्व लोकप्रतिनिधींस हे लागू होत नाही हेही खरे अशी खंतही व्यक्त केली.

सर्वसामान्याच्या मते प्रशासन ही खाजगी मालमत्ता(कंपनी) बनत चालली आहे,प्रशासनातील बदल्या,प्रकल्प मंजुरी,भरती,निधी वाटप ही सगळे निष्ठेवर ठरते,नियमावर नाही .सर्व नियम गुलदस्त्यात राहतात.त्यामुळे प्रामाणिक अधिकारी बाजूला पडून ते बदल्यांच्या भक्षस्थानी पडतात. याचा थेट फटका जनतेला बसतो. पाणी,रस्ते,आरोग्य शिक्षण या मूलभूत प्रश्नाकडे दुर्लक्ष होते. खरे पाहता जनतेची शांतता हा सर्वात मोठा धोका आहे.या सर्वावर जनतेने आवाज उठविला पाहिजे. मात्र हीच शांतता सत्ताधाऱ्यांची ताकद बनली आहे सगळेच सारखे विरोध करून काय फायदा.हीच मानसिकता लोकशाही पोखरत आहे.मूक संमती देणारा मतदार वाढत आहे.असेही सांगितले.

निवडणुकीतील प्रतिज्ञापत्रे तपासली जात नाही,खोटी आढळली तर कारवाई होईल याची खात्री धूसर होते.कर विभाग ,निवडणूक आयोग,चौकशी यंत्रणा, लेखापरीक्षण मौन धारण करतात,सर्वच ठिकाणी गोलमाल आणि गोलमाल.

लोकशाही टिकवायची असेल तर,ती मतदाना पुरती नको .संपत्ती वाढीचे कारण शोधले पाहिजे. निवडणुकी खर्चावर मर्यादा हवी. निधी संकलन यात पारदर्शकता हवी. सत्तेचा परीस स्पर्श काही निवडक, मोजक्याच प्रतिनिधींना मिळत असेल तर जनता मात्र कायमची उपाशी,तहानलेली, असुरक्षित राहिल .मग लोकशाही ही लोकांची राहते का?ती या कोट्याधीशांची मालकी बनते. यासाठी एस.टी तून प्रवास करणारे स्वर्गीय गणपतराव देशमुख यांच्या सारखे निस्वार्थी लोकप्रिय लोक प्रतिनिधी निर्माण होण्याची नितांत गरज आहे. असेही सांगितले.

# रायगड जिल्ह्यात व्हॅनद्वारे कॅन्सर तपासणी

## नागरिकांनी लाभ घेण्याचे आवाहन



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : कॅन्सरचा लवकर शोध लागून वेळेत उपचार मिळावेत, या उद्देशाने जिल्ह्यात दि. १ ते ३१ जानेवारी २०२६ या कालावधीत कॅन्सर व्हॅनद्वारे मोफत तपासणी मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेचा लाभ नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. निशिकांत पाटील यांनी केले आहे.

उपसंचालक, आरोग्य सेवा ठाणे यांच्या माध्यमातून कॅन्सर व्हॅन उपलब्ध करून देण्यात आली असून एटीपी नुसार जिल्ह्यातील विविध ग्रामीण व दुर्गम गावांमध्ये ही तपासणी मोहीम राबविण्यात येणार आहे. कॅन्सर व्हॅनसोबत स्त्रीरोगतज्ज्ञ, दंत शल्यचिकित्सक व सहाय्यक परिचारिका उपस्थित राहणार असून प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या माध्यमातून तपासणी केली जाणार आहे. दररोज किमान १५० नागरिकांची तपासणी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

कॅन्सरबाबत जनजागृती करणे व ग्रामीण भागातील नागरिकांपर्यंत आरोग्यसेवा पोहोचवणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश असून, जिल्ह्यातील वैद्यकीय अधिकारी, दंतशल्यचिकित्सक, अधीपरिचारिका व सहाय्यक परिचारिका यांचे सहकार्य या मोहिमेसाठी लाभणार आहे.

# वसंतराव मुंडे यांचा वाढदिवस मुरबाडमध्ये सामाजिक उपक्रमांनी साजरा



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड** : महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे मुंबई प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांना भविष्यात पत्रकारांचे आमदार म्हणून पाहण्याची अपेक्षा व्यक्त करत, त्यांच्या वाढदिवसानिमित्त ठाणे जिल्हाध्यक्ष शंकर करडे यांनी शुभेच्छा दिल्या. पत्रकारांशी संवाद साधताना करडे यांनी वसंत मुंडे यांच्या कार्याचा गौरव केला. दिक्षाभूमी, नागपूर ते मंत्रालय, मुंबई अशी संवाद यात्रा काढून पत्रकारांच्या विविध प्रश्नांना वाचा फोडण्याचे धाडसी काम मुंडे यांनी केले असून, अनेक प्रश्न मार्गी लावण्यासाठी त्यांनी प्रयत्न केल्याची माहिती करडे यांनी दिली.

यावेळी मुरबाड ग्रामीण रुग्णालय येथे सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत रुग्णांना अल्पहार व फळांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबईचे सल्लागार मेहबूबभाई पैठणकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक सुरेश बांगर,रूग्णालयाचे अधिक्षक डॉक्टर संग्राम डांगे,पोलीस रामचंद्र शिंदे , ठाणे जिल्हाध्यक्ष शंकर करडे यांच्या हस्ते फळे व अल्पउपहार वाटप करण्यात आले त्यावेळी ज्येष्ठ पत्रकार चंद्रकांत धनगर,संघटनेचे तालुकाध्यक्ष दिलीप पवार, सोशल मीडिया तालुकाध्यक्ष चेतन पोतदार, लोकक्रांती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष व भाजप युवा नेते नरेश मोरे, तालुका कोषाध्यक्ष स्वप्नाली भवार, पत्रकार दीपक चिडा, पत्रकार दिलीप पष्टे यांच्यासह रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वसंत मुंडे हे महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे मुंबई प्रदेशाध्यक्ष म्हणून कार्यरत असून, त्यांनी पत्रकारितेच्या क्षेत्रात भरीव योगदान दिले आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित या सामाजिक उपक्रमातून समाजप्रती असलेली संघटनेची बांधिलकी अधोरेखित झाली आहे.

# महिला व बाल विकास योजनांसाठी अर्जास मुदतवाढ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : महिला व बाल विकास विभाग, जिल्हा परिषद ठाणे यांच्या वतीने जिल्ह्यातील पात्र गरजू महिला, ५ वी ते १२ वीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या मुलींना तसेच विविध क्षेत्रांत विशेष प्राविण्य मिळविलेल्या मुला–मुलींसाठी ४ वैयक्तिक लाभाच्या योजना राबविण्यात येत असून, या योजनांसाठी १ जानेवारी २०२६ ते १५ जानेवारी २०२६ या कालावधीत अर्ज स्वीकारले जाणार आहेत.

या योजनांचा मुख्य उद्देश ग्रामीण व दुर्गम भागातील महिलांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, मुलींचे शिक्षण सुलभ करणे, तंत्रज्ञानाधारित कौशल्य विकासास प्रोत्साहन देणे तसेच विशेष प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी आर्थिक पाठबळ देणे हा आहे.

योजनांचा सविस्तर तपशील पुढीलप्रमाणे —

१) महिलांना स्वयंरोजगारासाठी विविध साहित्य पुरविणे

ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील पात्र महिलांना स्वयंरोजगारासाठी शिलाई मशीन, घरघंटी (पीठाची गिरणी), पिको फॉल मशीन तसेच तत्सम साहित्याचा लाभ देण्यात येणार आहे.

- **अनुदान मर्यादा :**
- साहित्याच्या एकूण किंमतीच्या ९०% किंवा
- घरघंटी / पिको फॉल मशीनसाठी कमाल ₹२०,०००/-
- शिलाई मशीनसाठी कमाल ₹६,५००/-
- अनुदानाची रक्कम थेट लाभ हस्तांतरण (DBT) पद्धतीने आधार संलग्न बँक खात्यावर जमा करण्यात येईल.

२) इयत्ता ५ वी ते १२ वीपर्यंत शिकणाऱ्या मुलींना सायकल पुरविणे

ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थिनींना शिक्षणासाठी ये–जा सुलभ व्हावी, या उद्देशाने शाळा ते घराचे अंतर किमान २ कि.मी. असलेल्या मुलींना सायकलचा लाभ दिला जाणार आहे.

- **अनुदान मर्यादा :**

o सायकलच्या एकूण किंमतीच्या ९०% किंवा

o कमाल ₹६,५००/-

- अनुदानाची रक्कम DBT द्वारे आधार संलग्न बँक खात्यावर जमा केली जाईल.

३) इयत्ता ७ वी ते १२ वी पास मुलींना संगणक प्रशिक्षण शुल्क

१ जानेवारी २०२४ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत संगणक प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केलेल्या मुलींनी प्रशिक्षण उत्तीर्ण प्रमाणपत्र सादर केल्यानंतर नियमानुसार संगणक प्रशिक्षण शुल्काचा लाभ देण्यात येईल.

- **अनुदान मर्यादा** : प्रति लाभार्थी कमाल ₹५,०००/-
- रक्कम DBT पद्धतीने आधार संलग्न बँक खात्यावर जमा केली जाईल.

४) विशेष प्राविण्य मिळविलेल्या मुला–मुलींचा सत्कार व आर्थिक मदत

राज्यस्तरावर कला, क्रीडा व अन्य क्षेत्रांत विशेष प्राविण्य मिळविलेल्या १८ वर्षांखालील मुला–मुलींचा सत्कार करून त्यांना इयत्ता १० वी व १२ वी नंतरच्या उच्च शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य दिले जाणार आहे.

- **अनुदान मर्यादा** : ₹२०,०००/- (अक्षरी रुपये वीस हजार मात्र)

**अर्ज प्रक्रिया**

या सर्व योजनांसाठी इच्छुक पात्र लाभार्थ्यांनी जिल्हा परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर https://zpthaneschemes.com या लिंकवर जाऊन ऑनलाईन पद्धतीने १५ जानेवारी २०२६ पर्यंत अर्ज सादर करावेत.

अर्ज प्रक्रिया पूर्णतः पारदर्शक व सोपी असून, योजनांचे सविस्तर तपशील, पात्रता निकष तसेच आवश्यक कागदपत्रांची यादी संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

"जिल्ह्यातील ग्रामीण भागातील पात्र गरजू महिला तसेच मुला–मुलींनी या योजनांचा लाभ घ्यावा. शासनाच्या माध्यमातून मिळणाऱ्या आर्थिक सहाय्याचा उपयोग करून स्वयंरोजगार व शिक्षणाच्या माध्यमातून सक्षमतेकडे वाटचाल करावी. अर्ज वेळेत सादर करणे अत्यंत महत्त्वाचे आहे," असे आवाहन महिला व बाल विकास विभागाचे प्रमुख जिल्हा कार्यक्रम अधिकारी श्री. संजय बागुल यांनी केले आहे.जिल्हा परिषद ठाणे यांच्या वतीने पात्र लाभार्थ्यांनी मोठ्या संख्येने अर्ज करून या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
https://www.facebook.com/jeevandeepnews/
https://www.instagram.com/thane_jeevandeep/
https://x.com/Jeevandeepvarta
https://jeevandeepvarta.com/

# भविष्यवेध



शुक्रवार
०२ जानेवारी २०२६

**मेष**
नववर्षाच्या सुरूवातील तुम्ही तुमच्या कुटुंबासह धार्मिक स्थळाला भेट देऊ शकता. या राशीच्या विवाहित लोकांसाठी आजचा दिवस खूप चांगला आहे.

**वृषभ**
तुमच्या मुलाच्या यशामुळे आनंद मिळेल. तुमचे वैवाहिक जीवन सुखाने भरलेले असेल. आज एका खास नातेवाईकाची भेट होईल.

**मिथुन**
तुम्हाला उर्जेने परिपूर्ण वाटेल. आज तुम्ही हाती घेतलेले कोणतेही काम वेळेपूर्वी पूर्ण होईल. तुम्ही वैवाहिक संघर्ष सोडवण्याचा प्रयत्न कराल.

**कर्क**
मित्रांसोबत एखाद्या विशिष्ट विषयावर चर्चा केल्याने तुम्हाला फायदा होऊ शकतो. आज धैर्य आणि संयम वाढेल. नवीन वर्षआंची सकारात्मक सुरूवात होईल.

**सिंह**
कोणतेही मोठे आर्थिक व्यवहार करताना सावधगिरी बाळगली पाहिजे. तसेच आर्थिक लाभाचे नवीन स्रोत उदयास येऊ शकतात.

**कन्या**
आज तुम्ही ऑफिसची प्रलंबित कामं पूर्ण करण्यावर भर द्याल, त्यामुळे खांद्यावरून मोठं ओझं उतरेल. रखडलेले काम आज पुन्हा सुरू कराल.

**तुळ**
व्यवसायिक त्यांच्या पार्टनर्सशी व्यावसायिक बाबींवर चर्चा करण्यासाठी भेटतील. वाढत्या नफ्यामुळे कापड व्यापारी खूश होतील.

**वृश्चिक**
मनासारखे निर्णय होतील. कामावर यश मिळेल. विद्यार्थ्यांकडून झालेला थोडीशी निष्काळजीपणा निराशेला कारणीभूत ठरू शकतो; कठोर परिश्रम करत रहा.

**धनु**
तुमच्या मुलांकडून तुम्हाला चांगली बातमी मिळेल. घरातील वातावरण आनंददायी राहील. अडकलेले व्यवसायिक पैसे परत मिळू शकतात.

**मकर**
आज अनपेक्षित घटनांपासून सावध रहा. सकारात्मक दृष्टिकोन राखल्याने तुम्ही हाती घेतलेले सर्व काही चांगले होईल याची खात्री होईल.

**कुंभ**
तुम्ही एखाद्या क्रीडा स्पर्धेत सहभागी होऊ शकता. या राशीत जन्मलेल्या आणि नोकरी करणाऱ्यांना चांगल्या ऑफर मिळण्याची शक्यता आहे.

**मीन**
तुमचा कल अध्यात्माकडे अधिक असेल. दिवस तुमच्यासाठी आनंद घेऊन येईल. योजना अमलात आणाल, फायदा वाढेल. कठोर परिश्रम करत रहा.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



# कल्याण–डोंबिवलीत दोन जागी युतीत ताण

## भाजप उमेदवाराविरुद्ध शिवसैनिकांची बंडखोरी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

डोंबिवली - कल्याण डोंबिवली पालिका निवडणुकीसाठी शिवसेना (एकनाथ शिंदे), भाजपने सामंजस्याने ६८ (शिवसेना)- ५४ (भाजप) या सुत्राने जागा लढविण्याचा निर्णय घेतला आहे. मंगळवारी उमेदवारी अर्ज भरण्याच्या दिवशी शिवसेना शिंदे गट, भाजपची युती असुनही एकमेकांना अंधारात ठेऊन दोन्ही पक्षांनी दावा केलेल्या प्रभागांमध्ये परस्पर विरोधी उमेदवारी अर्ज दाखल केले. त्यामुळे शिवसेना शिंदे गट, भाजपमध्ये तणावाचे वातावरण होते. बुधवारी दिवसभरात उमेदवारी अर्जाची छाननी, अर्ज माघारी घेण्याच्या प्रक्रियेत भाजप, शिवसेनेतील उमेदवारांनी एकेमकांविरूध्द भरलेले उमेदवारी अर्ज मागे घेतले.

डोंबिवली पश्चिमेत भाजपचे प्रदीप जोशी आणि शिवसेना शिंदे गटाचे जनार्दन म्हात्रे यांच्या पॅनलमधील तिढा सुटत नसल्याने शिवसेना शिंदे गट, भाजपमध्ये रस्सीखेच सुरू आहे. डोंबिवली पश्चिमेत पालिका ह प्रभाग हद्दीतील प्रभाग क्रमांक २१ या पॅनलमधील २१ अ या प्रभागातील उमेदवारी जागा वाटपात भाजपच्या वाट्याला आली. हा प्रभाग यापूर्वीचा शिवसेनेचे नगरसेवक जनार्दन म्हात्रे यांचा. आपल्या वाट्याला हा प्रभाग आल्याने भाजपने प्रदीप महादू जोशी यांना या प्रभागात उमेदवारी दिली. त्यांनी उमेदवारी अर्जही भरला. भाजपच्या या प्रभागात भाजपला अंधारात ठेऊन शिवसेनेने स्थानिक माजी नगरसेवक शिवसेना शिंदे गटाचे जनार्दन म्हात्रे यांना उमेदवारी दिली.

या उमेदवारीला भाजपने हरकत घेतली आणि जनार्दन म्हात्रे यांची उमेदवारी माघार घेण्याची मागणी केली. सतत सांगूनही जनार्दन यांनी भाजपचे प्रदीप जोशी यांच्या विरूध्दचा उमेदवारी अर्ज माघार घेतला नाही. या प्रभागात मनसेचे ज्येष्ठ कार्यकर्ते आणि संत साहित्याचे गाढे अभ्यास, सामाजिक कार्यकर्ते प्रल्हाद परशुराम म्हात्रे निवडणूक रिंगणात आहेत. बाजुच्या प्रभागात त्यांची कन्या अ‍ॅड. रविना म्हात्रे निवडणूक लढवित आहेत. प्रल्हाद म्हात्रे यांना सुरूवातीला भाजपकडून उमेदवारीसाठी विचारणा झाली होती. पण त्यांनी त्यास स्पष्ट नकार दिला होता. त्यामुळे भाजपने प्रदीप जोशी यांना पॅनल २१ मधून उमेदवारी देण्याचा निर्णय घेतला होता.

शिवसेनेने इतर प्रभागांमध्ये भाजप उमेदवारांविरूध्द भरलेले उमेदवारी अर्ज बुधवारी मागे घेऊन भाजप उमेदवाराचा विजयाचा मार्ग मोकळा केला. त्यामुळे जनार्दन म्हात्रे यांनीही उमेदवारी अर्ज मागे घ्यावा, यासाठी भाजपने शिवसेनेला कळविले आहे. शिवसेना शिंदे गटातील एका नेत्याच्या दबावामुळेच आणि भाजप उमेदवाराला घाम फोडण्यासाठी ही खेळी केली असल्याची राजकीय वर्तुळात चर्चा आहे. असाच प्रकार कल्याण पश्चिमेत प्रभाग क्रमांक ७ ड मध्ये करण्यात आला आहे. हा प्रभाग जागा वाटपात भाजपच्या वाट्याला आला आहे. या प्रभागातून भाजपचे डॉ. पंकज उपाध्याय यांनी उमेदवारी अर्ज भरला आहे. त्यांना शह देण्यासाठी शिवसेनेचे (एकनाथ शिंदे) पक्ष मोहन उगले यांनी उमेदवारी अर्ज भरला आहे. उगले उमेदवारी अर्ज माघार घेण्यास तयार नसल्याचे समजते. त्यामुळे हा तिढा कायम आहे.

डोंबिवलीत काही प्रभागांमध्ये खासदार डॉ. श्रीकांत शिंदे समर्थक शिवसेना पदाधिकाऱ्यांनी भाजप प्रभागात अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज भरले आहेत. भाजप उमेदवारांची दमणूक करण्यासाठी शिवसेनेने ही खेळ केली असल्याची चर्चा आहे. आज उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या दिवशी हे अर्ज मागे घेतले जाणार आहेत असे समजते.

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

जाहीर सूचना

ठाणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५

सर्व प्रभागांच्या मतदान केंद्र निहाय मतदार याद्या प्रसिध्दीबाबत.

ठाणे महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक घेणेकरीता मा. राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.८०/का-५, दिनांक १५.१२.२०२५ अन्वये गुरुवार, दिनांक १५.०१.२०२६ रोजी मतदान होणार असून, मतदानाची वेळ सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० पर्यत निश्चित करण्यात आलेली आहे.

मा.राज्य निवडणूक आयोगाने पत्र क्र.रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.४१/का-५, दिनांक १४.१०.२०२५, दिनांक ०४.११.२०२५, दिनांक १३.११.२०२५, दिनांक २६.११.२०२५ व दिनांक ०९.१२.२०२५ अन्वये जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार दिनांक १५.१२.२०२५ रोजी प्रभाग निहाय अंतिम मतदार याद्या प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत.

मा. राज्य निवडणूक आयोगाकडील पत्र क्रमांक रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.४१/का-५, दि.१४.१०.२०२५, दि.२६.११.२०२५ व दि.०९.१२.२०२५ अन्वये ठाणे महानगरपालिकेच्या एकूण ३३ प्रभागांकरीता प्रभाग निहाय मतदान केंद्रांच्या ठिकाणांची यादी दिनांक २०.१२.२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची प्रकरण क्र. १ निवडणूक नियमांतर्गत नियम १४ (१) अन्वये प्रभाग क्र. १ ते प्रभाग क्र.३३ मधील सर्व जागांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी एकूण २०१३ मतदान केंद्रे निश्चित करण्यात येत असून, मा. राज्य निवडणूक आयोगाकडील पत्र क्रमांक रानिआ/ मनपा-२०२५/प्र.क्र.४१/का-५, दि.१४.१०.२०२५, दि.२६.११.२०२५, दि.०९.१२.२०२५ व दि. २६.१२.२०२५ अन्वये सर्व १ ते ३३ प्रभागांच्या सर्व जागांकरीता मतदान केंद्रनिहाय मतदार याद्या दिनांक ०२.०१.२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात येत आहेत.

प्रस्तूत मतदान केंद्रनिहाय मतदार याद्या ठाणे महानगरपालिकेच्या www.thanecity.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेल्या आहेत. तसेच कार्यालयीन वेळेत निवडणूक विभाग (मुख्यालय) येथे सदर मतदान केंद्रनिहाय मतदार यादीची मागणी केल्यास नागरी सुविधा केंद्र, महानगरपालिका मुख्यालय येथे शुल्क रुपये २/- प्रतीपृष्ठ भरुन विक्रीसाठी उपलब्ध केल्या आहेत.

ठामपा/पिआरओ/निवडणूक/१०६८/२०२५-२६

दि:०१.०१.२०२६

**Pls visit our official web-site**

**www.thanecity.gov.in**

सही/-

सौरभ राव, भा.प्र.से

प्रशासक तथा आयुक्त,

ठाणे महानगरपालिका, ठाणे.

**जागरूक नागरिक मी ठाण्याचा, हक्क बजावेन मतदानाचा!**

# गंगा आरतीला मोठी गर्दी; ठाण्यात क्षणिक गोंधळ

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** - श्री कौपिनेश्वर सांस्कृतिक न्यासाच्यावतीने ३१ डिसेंबर रोजी मासुंदा तलाव येथे गंगा आरतीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आरती दरम्यान मासुंदा तलाव परिसरात प्रचंड गर्दी झाल्याने काही काळ चेंगराचेंगरीसारखी परिस्थिती निर्माण झाली. गंगा आरती पाहण्यासाठी आलेल्या अनेक महिला एकमेकांना ढकलत असल्याचे चित्र समाज माध्यमांवर प्रसारित झालेल्या व्हिडिओमध्ये दिसून आले.

श्री कौपिनेश्वर सांस्कृतिक न्यास या संस्थेच्यावतीने ठाणे शहरात ३० आणि ३१ डिसेंबर असे दोन दिवस गंगा आरतीचे आयोजन करण्यात आले होते. ३० डिसेंबर रोजी उपवन तलाव येथे तर ३१ डिसेंबर रोजी मासुंदा तलाव येथे गंगा आरती पार पडली. या आरतीसाठी खास वाराणसी येथून पंडितांना निमंत्रित करण्यात आले होते. त्यांच्या हस्ते पारंपरिक पद्धतीने गंगा आरती करण्यात आली.

मंत्रोच्चार, शंखनाद, दिव्यांचा प्रकाश आणि भक्तिभाव यामुळे परिसरात काही काळ काशी-हरिद्वारसारखी आध्यात्मिक अनुभूती निर्माण झाली होती. हातात पंचारती दिवे, समोर प्रज्वलित केलेले दीप यामुळे संपूर्ण परिसर उजळून निघाला होता. तसेच 'हर हर गंगे' आणि 'हर हर महादेव'च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता.

# महापालिका निवडणूक पूर्व तयारीचा आयुक्त डॉ. कैलास शिंदेंकडून आढावा

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

नवी मुंबई - शहरात पालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. नवी मुंबई महापालिका सार्वत्रिक निवडणुकीची प्रक्रिया सुरू झाली असून नामनिर्देश पत्रांची छाननी देखील पार पडली. तसेच निवडणुकीच्या काळातील कामकाजाचा आढावा महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी डॉ. कैलास शिंदे यांनी घेतला. यावेळी सुनियोजित आणि पारदर्शकरित्या निवडणुकांसाठी विविध सूचना देण्यात आल्या.




स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची प्रक्रिया सर्वत्र सुरू आहे. अशातच निवडणुकीच्या कार्यकाळात सर्व कामकाज सुरळीतपणे चालावे, यासाठी प्रशासनाच्यावतीने विविध योजना आखल्या जात आहेत. याकरिता नवी मुंबई पालिकेची आढावा बैठक पार पडली. यात निवडणूकीसाठी राज्य निवडणूक आयोगाने नियुक्त केलेले मुख्य निवडणूक निरीक्षक तथा महाराष्ट्र पेट्रोकेमिकल्स महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. भाऊसाहेब दांगडे यांनी सर्व विभागांचे निवडणूक निर्णय अधिकारी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तसेच विभाग अधिकारी यांनी निवडणुक कालावधीतील कामांबाबत सूचना दिल्या.

# लाडक्या बहिणींना केवायसीसाठी मुदतवाढ?

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना (CMML) योजनेतील महिला लाभार्थ्यांसाठी ई-केवायसीची अंतिम मुदत वाढवण्याची चर्चा आहे. योजनेनुसार त्यांना आता ३१ जानेवारीपर्यंत त्यांचे ई-केवायसी पूर्ण करण्याची संधी मिळेल. जिल्हा महिला आणि बालविकास कार्यालयाला अद्याप याबद्दल अधिकृत पत्र मिळालेले नाही.**

यामुळे प्रक्रियेबाबत महिला लाभार्थ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. महायुती सरकारच्या महत्त्वाकांक्षी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी, पात्र महिला लाभार्थ्यांसाठी ई-केवायसी अनिवार्य करण्यात आले आहे. ही प्रक्रिया १८ सप्टेंबर रोजी सुरू झाली. सुरुवातीची अंतिम मुदत १८ नोव्हेंबर होती. अनेक महिला निर्धारित वेळेत त्यांचे ई-केवायसी पूर्ण करू शकल्या नाहीत, म्हणून विभागाने ही अंतिम मुदत ३१ डिसेंबरपर्यंत वाढवली. ही अंतिम मुदत ३१ डिसेंबर रोजी संपत असताना, मोठ्या संख्येने महिलांच्या ई-केवायसी प्रक्रिया अद्याप अपूर्ण असल्याचे समोर आले आहे. ग्रामीण भागात, तांत्रिक समस्या, इंटरनेट समस्या, माहितीचा अभाव आणि कागदपत्रांमधील त्रुटींमुळे अनेक लाभार्थ्यांना त्यांचे ई-केवायसी पूर्ण करता आले नाही. त्यामुळे पुन्हा एकदा अंतिम मुदत वाढवण्याची चर्चा आहे. त्यानुसार, ई-केवायसी आता ३१ जानेवारीपर्यंत पूर्ण करता येईल असे संकेत आहेत.

# जीवावर बेतली थर्टीफस्टची पार्टी

## नववर्षापूर्वीच शोकांतिका : शहापूरात एकाचा मृत्यू, दोघे गंभीर

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**शहापूर** : नववर्षाच्या स्वागतासाठी ३१ डिसेंबरला आयोजित केलेली पार्टी तरुणाच्या जीवावर बेतली आहे. पार्टी संपवून शहापूरच्या दिशेने दुचाकीवरून येत असताना अज्ञात वाहनाला पाठीमागून जोरदार धडक दिल्याने एका तरुणाचा मृत्यू झाला तर दोघेजण गंभीर जखमी झाले आहेत. शेणवा-शहापूर रस्त्यावर कर्म रेसिडेन्सी भागात हा प्रकार उघडकीस आला. या अपघातात दुचाकीस्वार सलीम साबीर शेख (२६) या तरुणाचा मृत्यू झाला असून बालिजी रेरा व भगवान चौधरी हे दोघे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. ३१ डिसेंबरची पार्टी झाल्यानंतर तिघेजण दुचाकीवरून शहापूरच्या दिशेने येत होते. सलीम व भगवान यांनी अति मद्यप्राशन केले होते. नशेत दुचाकी चालवणाऱ्या सलीम याला वारंवार "वाहन हळू चालव, वाकडी-तिकडी चालवू नकोस, नाहीतर मला गाडी दे" असे बालिजीने सांगूनही त्याने दुर्लक्ष केल्याने समोरील अज्ञात वाहनाला पाठीमागून जोरदार धडक बसली. या अपघातात साबीर याचा मृत्यू झाला. या प्रकरणी शहापूर पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून अधिक तपास सुरू आहे.

# पावसाच्या सरींनी नववर्षाची सरुवात

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**उल्हासनगर, ता. १ (वार्ताहर)**

नववर्षाच्या पहिल्याच दिवशी निसर्गाने अनोखे स्वागत करत उल्हासनगरकरांना आश्चर्याचा धक्का दिला. १ जानेवारीच्या पहाटे अचानक पावसाच्या हलक्या सरी कोसळल्या, तर दिवसभर शहरावर ढगाळ वातावरणाची चादर पसरून राहिली. नववर्षाच्या स्वागतासाठी उत्साहात असलेले नागरिक या बदललेल्या हवामानामुळे काहीसे आश्चर्यचकित झाले. पहाटे पडलेल्या पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला. नेहमीच्या हिवाळी थंडीला पावसाच्या सरींची जोड मिळाल्याने हवेत आल्हाददायक ओलावा जाणवू लागला. सकाळी फिरायला निघालेले नागरिक, कामावर जाणारे कर्मचारी; तसेच बाजारपेठांकडे जाणाऱ्यांना पावसामुळे काही प्रमाणात गैरसोय झाली. मात्र, पावसामुळे रस्त्यांवरील धूळ बसून शहराला काही काळ स्वच्छ व ताजे रूप प्राप्त झाले. दिवसभर सूर्यदर्शन न झाल्याने ढगाळ वातावरण कायम राहिले. काही भागांत हलकी रिमझिम सुरूच होती, तर काही ठिकाणी आकाशात काळ्या ढगांची दाटी दिसून आली. या हवामानाचा परिणाम नववर्षाच्या पहिल्या दिवसाच्या कार्यक्रमांवरही झाला. सकाळी नियोजित असलेले बाहेरील कार्यक्रम, सहली तसेच कौटुंबिक भेटी काही नागरिकांनी पुढे ढकलल्या. एकूणच, नववर्षाच्या पहिल्याच दिवशी पडलेल्या पावसाच्या सरी आणि दिवसभर राहिलेल्या ढगाळ वातावरणामुळे उल्हासनगरचे वातावरण वेगळ्याच रंगात रंगले.




# अपुऱ्या रस्त्यामुळे वाडा-भिवंडी महामार्गावर गंभीर अपघात

## प्रशासनाच्या निष्काळजीपणाचा फटका, दुचाकीस्वाराचा पाय निकामी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**वाडा : नवीन वर्षाची सुरुवातच अपघाताने झाली असून कामावरून घरी परतणाऱ्या दुचाकी स्वारकचा अपघातात पाय निकामी झाल्याची दुर्दैवी घटना गुरुवारी (०१ जानेवारी) सायंकाळी ५:१५ वाजता घडली आहे. या अपघाताबाबत वाडा पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.**

वाडा-भिवंडी महामार्गावरील मुसारणे फाट्यावर रस्त्याच्या अपूर्ण कामामुळे झालेल्या गंभीर अपघातात दुचाकीस्वार प्रसाद महाडीक यांचा पाय निकामी झाला आहे. रस्त्याचे काम करणाऱ्या "ईगल इन्फ्रास्ट्रक्चर" या कंत्राटदार कंपनीच्या व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बेजबाबदारपणामुळे हा अपघात घडल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.



वाडा - अंबाडी मार्गावर असलेल्या मुसारणे फाट्याजवळ रस्त्याचे काँक्रिटीकरणाचे काम सुरू असून ते अर्धवट अवस्थेत सोडण्यात आले आहे. रस्त्यावर मोठे खड्डे, खचलेले कडे तसेच उंचसखल भाग निर्माण झाले असून, या ठिकाणी कोणतीही सुरक्षिततेची उपाययोजना करण्यात आलेली नाही. विशेष म्हणजे अपूर्ण कामाच्या ठिकाणी कोणतेही सूचना फलक, बॅरिकेड्स अथवा धोक्याची पूर्वसूचना देणारी व्यवस्था नसल्याने वाहनचालकांचे मोठ्या प्रमाणात हाल होत आहेत. दुचाकीस्वार प्रसाद महाडीक (रा. कुडूस) हे गाळा कंपनीत कामाला होते, ते कामावरून घरी परतत असताना त्यांचा अपघात झाला.

# भाजपचा बिनविरोध विजयाचा 'पंच!'

पान १ वरून ▶▶▶ आहेत. त्यामुळे पक्षीय उमेदवारांच्या शब्दाचा मान ठेऊन प्रभागात चांगली कामे करण्याची आश्वासने घेऊन काही अपक्ष मंडळी निवडणूक रिंगणातून माघार घेत आहेत. शिवसेना शिंदे गट, भाजपमधील उमेदवारांचा बिनविरोध निवडीचा मार्ग मोकळा होत आहे.

कल्याणमध्ये पक्षीय उमेदवारांच्या विरूध्द उमेदवारी अर्ज दाखल करणाऱ्या अपक्ष उमेदवारांची संख्या अधिक आहे. त्यामुळे या अपक्षांना शांत करणे अवघड जात असल्याचे एका पदाधिकाऱ्याने सांगितले. या बिनविरोध निवडीमुळे इतर पक्षांमधील उमेदवार मात्र धास्तावले आहेत. चार प्रभागांमधून एकावेळी कोणतेही साहाय्य नसताना प्रचार करणे खूप अवघड असल्याचे या उमेदवारांचे मत आहे. मतदारांच्या दारात गेल्यावर ते विविध प्रकारच्या समस्या समोर ठेऊन तोंड बंद करतात. त्यांची समजूत काढणे मग खूप अवघड जाते. यापूर्वीच्या नगरसेवकांनी काही कामे केली नाहीत त्याची उत्तरे आम्हाला द्यावी लागतात, असे काही अपक्ष उमेदवारांनी सांगितले.

### कल्याण-डोंबिवली महानगरपालिका निवडणुकीत भाजपा-महायुतीचा डंका !

प्रभाग क्र. २४-ब मधून भाजपच्या ज्योतीताई पवन पाटील यांच्यासह या प्रभागातून महापालिका निवडणुकीसाठी उभे असणारे भाजपा-महायुतीचे चारही उमेदवार बिनविरोध विजयी झाले आहेत. सर्वांचे हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा ! कल्याण-डोंबिवली हा 'राष्ट्र प्रथम' या विचारधारेचा बालेकिल्ला आहे, त्यामुळे या निवडणुकीच्या पहिल्या दिवसापासूनच भाजपा-महायुतीचा डंका वाजत आहे.

**- रविंद्र चव्हाण (भाजप प्रदेशाध्यक्ष)**



# वसई विरारकरांची वाहतुक कोंडीतून सुटका कधी?

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**वसई:** वसई विरार शहर जरी वेगाने विकसित होत असली तरी शहरात वाहतूक कोंडीची समस्याही तितक्याच वेगाने वाढत आहे. वाहतूक नियोजनाचा अभाव, सातत्याने वाढणारी खाजगी वाहनांची संख्या, नादुरुस्त रस्ते यामुळे दिवसेंदिवस शहरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न गंभीर बनत चालला आहे. त्यामुळे यावेळी तरी निवडून येणारा उमेदवार वाहतूक कोंडीतून आमची सुटका करणार का? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

# १६ दुरंगी; तर २० तिरंगी लढती

## पनवेल पालिकेत माघाराआधीच बहुरंगी लढती स्पष्ट

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पनवेल** - पनवेल महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या रणधुमाळीला वेग आला असून उमेदवारी अर्ज छाननीनंतरचे चित्र स्पष्ट होत चालले आहे. माघार कालावधीसाठी अवघे २४ तास शिल्लक असतानाच, अनेक प्रभागांमध्ये दुरंगी-तिरंगी लढतींचे संकेत मिळत असून काही ठिकाणी बहुरंगी लढती होण्याच्या शक्यतेमुळे राजकीय वातावरण अधिकच तापले आहे. पनवेल महापालिकेच्या ७८ जागांसाठी एकूण ४०० उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. त्यापैकी बुधवारी रात्री उशीरापर्यंत केलेल्या छाननीअंती ३४३ उमेदवारी अर्ज वैध ठरले आहेत. या वैध अर्जाच्या आधारे सध्याच्या स्थितीत १६ जागांवर दुरंगी, तर २० जागांवर तिरंगी लढत होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे सध्या पनवेलकरांचे लक्ष तब्बल ३६ जागांकडे लागले आहे. मात्र, माघार घेण्याची मुदत संपेपर्यंत हे चित्र बदलण्याची शक्यता कायम आहे. काही तिरंगी लढतींमध्ये डमी उमेदवार किंवा अपक्ष उमेदवार माघार घेतील, अशी शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे अंतिम लढतीतील उमेदवारांची संख्या माघार कालावधीनंतरच निश्चित होणार आहे. याच पार्श्वभूमीवर नाराज इच्छुक, अपक्ष व बंडखोर उमेदवारांची मनधरणी करण्यासाठी राजकीय पक्षांकडून विविध प्रयत्न सुरू झाले आहेत.




**दरम्यान, काही प्रभागांमध्ये अर्जाची संख्या लक्षणीय आहे. प्रभाग क्रमांक ३ मधील एका जागेसाठी तब्बल ११ अर्ज आले असून, प्रभाग क्रमांक ८ (कळंबोली) येथील एका जागेसाठीही ११ अर्ज दाखल झाले आहेत. प्रभाग क्रमांक ११ मध्ये एका जागेसाठी १३ अर्ज, प्रभाग क्रमांक १२ मध्ये १० अर्ज, तर प्रभाग क्रमांक १५ मधील दोन जागांसाठी प्रत्येकी १० अर्ज दाखल झाले आहेत. यामुळे या प्रभागांतील लढती विशेष लक्षवेधी ठरणार आहेत. प्रभाग क्रमांक १८ मधील एका जागेवर शेकापच्या उमेदवाराचा अर्ज छाननीत बाद झाल्याने भाजपचे उमेदवार नितीन जयराम पाटील यांचा बिनविरोध मार्ग मोकळा झाला. यानंतर त्यांच्या समर्थकांनी निवडणूकपूर्वीच आनंदोत्सव साजरा केला. मात्र, याच प्रभागातील दुसऱ्या एका जागेसाठी ९ अर्ज दाखल झाल्याने तेथे अजूनही चुरशीची लढत होण्याची शक्यता आहे. इच्छुकांना उमेदवारी न मिळाल्याने मोठ्या प्रमाणावर बंडखोरीची शक्यता असून, आजचा दिवस पनवेलच्या राजकारणासाठी अत्यंत निर्णायक ठरणार आहे.**

# कवी नारायण सुर्वे यांच्या जन्मशताब्दी निमित्त " रंग तुमचे शब्द सुर्वेंचे " चित्रकला स्पर्धा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** पु.ल. कट्टा कल्याण ही साहित्य, संस्कृती, कला क्षेत्रात काम करणारी संस्था असून पु ल कट्याने सन २००६ साली पोलिसातील कलागुणांना वाव मिळावा म्हणून पोलीस प्रतिभा संमेलनाचे आयोजन केले होते. त्याचे उद्घाटन तत्कालीन मुख्यमंत्री श्री सुशीलकुमार शिंदे यांनी केले होते तर समारोप गृहमंत्री आर आर पाटील यांनी केले होते. तर सदर संमेलनाचे अध्यक्षपद पद्मश्री कविवर्य नारायण सुर्वे यांनी भूषविले होते. २०२५-२०२६ हे वर्ष कविवर्य नारायण सुर्वे यांचे जन्मशताब्दी वर्ष आहे. त्याचे औचित्य साधून पु ल कट्ट्याने नारायण सुर्वे यांना अभिवादन करण्याकरिता विविध उपक्रमाचे आयोजन केले आहे. त्यातीलच एक भाग म्हणजे कविवर्य नारायण सुर्वे यांच्या कोणत्याही कवितेवर आधारित " रंग तुमचे, शब्द नारायण सुर्वेंचे " या चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. हि चित्रकला स्पर्धा १) शालेय गट इयत्ता ८ वी ते १२ वी २) महाविद्यालयीन पदवी, पदवीका आणि ३) खुला गट अन्य सर्वांसाठी अशा तीन गटात होणार असून स्पर्धा विनामूल्य असून स्पर्धकांनी कविवर्य नारायण सुर्वे यांच्या कोणत्याही एका कवितेवर आधारित चित्र १२×१८ इंच कागदावर काढून डीपी मध्ये स्कॅन करून pulkatta20@gimail.com या ईमेलवर ज्या कवितेवर आधारित चित्र आहे त्या कवितेसह दि १५ जानेवारी २०२६ पर्यंत पाठवावे असे आवाहन पु ल कट्टा संयोजक प्रा. महेंद्र भावसार यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी ९८६९८६९८४४ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा.

## पडघ्यात अंखड हरीनाम सप्ताहाचे आयोजन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पडघा** : "राम कृष्ण हरी" च्या गजरात संत महात्मांच्याआशिर्वादाने भिंवडी तालुक्यातील पडघा येथे विविध आध्यात्मिक कार्यक्रमाव्दारे अंखड हरीनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

वारकरी सांप्रदाय मंडळ पडघे (रजि.) यांच्या वतीने दरवर्षी प्रमाणे यावर्षीही ३ ते १० जानेवारी दरम्यान वैश्य समाज विठ्ठल रुक्मिणी मंदीर प्रांगणात या सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असुन मंडळाचे हे ४२ वे वर्ष आहे. त्यामध्ये दररोज पहाटे काकड आरती, प्रभातफेरी, ज्ञानेश्वरी पारायण, नामस्मरण, महीला भजन, सायंकाळी शिवपुराण कथा, सामुदायिक हरिपाठ, रात्री नामवंत महाराजांचे सुश्राव्य किर्तन असे भरगच्च आध्यात्मिक कार्यक्रम घेण्यात येणार आहेत. तर ९ जानेवारी रोजी सायंकाळी संपूर्ण पडघे गावातुन टाळ मृदूंगाच्या गजरात पारंपारिक वेशभूषेत पालखी सोहळा,दीपज्योती कार्यक्रम घेण्यात येणार आहे. तसेच सप्ताहाची सांगता १० जानेवारी रोजी हभप भागवताचार्य गणेश महाराज फुलकुंटवार (कादंळी) यांच्या काल्याचे किर्तन व त्यानंतर महाप्रसादाने होणार असुन परीसरातील हरीभक्तांनी, नागरीकांनी त्याचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# नववर्षाला टिटवाळा गणपती दर्शनासाठी भाविकांची मांदियाळी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** नववर्षाच्या स्वागतासाठी महाराष्ट्रभरातील देवस्थाने भक्तांनी गजबजून गेली आहेत. त्यामध्ये ठाणे जिल्ह्यातील श्रद्धास्थान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या टिटवाळा सिद्धिविनायक मंदिरात नववर्षाच्या पहिल्याच दिवशी भाविकांची विक्रमी गर्दी झाली. पहाटेपासूनच दर्शनासाठी रांगा वाढत गेल्या आणि काही वेळातच संपूर्ण मंदिर परिसर भाविकांनी खचाखच भरून गेला. मुंबई, ठाणे, कल्याण, डोंबिवली आणि ग्रामीण भागांतून मोठ्या संख्येने भक्त बाप्पाच्या चरणी नतमस्तक होण्यासाठी दाखल झाले होते. "गणरायाच्या जयघोषाने" मंदिर परिसर सतत दुमदुमून गेला. तलावातील बोटिंग, मुलांसाठी असलेली खेळण्यांची दुकाने, फुगे आणि खाद्यपदार्थांचे स्टॉल यांमुळे परिसराला जत्रेचे स्वरूप लाभले. वाढत्या गर्दीमुळे फुल, नारळ आणि पूजा साहित्य विक्रेत्यांच्या विक्रीतही मोठी वाढ झाली.




मंदिर प्रशासनाने भाविकांसाठी पिण्याचे पाणी, रांग व्यवस्थापन, स्वच्छतागृहे या सुविधा उपलब्ध करून शिस्तबद्ध व्यवस्था राखली. पहाटे चार वाजता दर्शनासाठी मंदिराचे दरवाजे उघडण्यात आले असून भाविकांची लाट दिवसभर कायम राहिली. मंदिर विश्वस्त सुभाष जोशी यांनी सांगितले की, नववर्षाची सुरुवात बाप्पाच्या दर्शनाने करण्याची परंपरा गेल्या दशकभरापासून अधिक बळकट झाली आहे. सकाळपासूनच सुमारे एक लाख भाविकांनी दर्शन घेतले असून हा आकडा रात्रीपर्यंत लक्षणीयरीत्या वाढण्याची शक्यता आहे.

गर्दीचे योग्य नियोजन करण्यासाठी टिटवाळा पोलिसांनी तातडीने वाहतूक व्यवस्था मजबूत केली. काही ठिकाणी अल्पकाळ वाहतूक कोंडी झाली असली तरी पर्यायी मार्गांचा वापर करून परिस्थिती सुरळीत करण्यात आली.

यावेळी नरेंद्र महाराज सांप्रदायाचे सेवेकरीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून भाविकांना मदत करताना दिसले. त्यांनी रक्तदानाचे महत्त्व पटवून देत सामाजिक जागृतीचा संदेशही दिला. भक्तिभाव, सेवा आणि सामाजिक कर्तव्यभावना — या तिन्हींचा सुंदर संगम नववर्षाच्या शुभप्रसंगी टिटवाळ्यात पाहायला मिळाला.

बाप्पाच्या दर्शनाने नव्या वर्षाची सुरुवात झाल्याने भाविकांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंद ओसंडून वाहताना दिसला. अनेकांसाठी ही अनुभूती केवळ धार्मिक नव्हे तर मन:शांती देणारी ठरल्याचे पाहायला मिळाले.

## शिवसेना विभाग प्रमुख अनंता पगार यांचा राजीनामा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण डोंबिवली महानगरपालिका निवडणुकीत शिवसेना भाजपाची युती झाल्याने दोन्ही पक्षातील अनेक इच्छुकांमध्ये नाराजी पसरली आहे. कित्येक जणांना उमेदवारी अर्ज दाखल न करता आल्याने व्यथित असून याचाच परिणाम म्हणून अनेकांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे तर अनेकांनी दुसऱ्या पक्षातून अथवा अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. अशातच कल्याण पश्चिम मधील विभाग प्रमुख अनंता पगार हे देखील इच्छुक होते मात्र पक्षाने उमेदवारी न दिल्याने अखेर नाराज पगार यांनी आपल्या विभाग प्रमुख पदाचा राजीनामा शिवसेना मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे दिला आहे.

अनंता पगार हे सन 2005 पासून गेली 20 वर्षे शिवसेना पक्षात सक्रिय आहेत. पक्ष संघटना वाढीसाठी तसेच नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी पगार हे नेहमी कार्यरत होते. परंतु सद्यस्थितीत पक्षाच्या स्थानिक नेतृत्वाकडून अनंता पगार व त्यांच्या प्रभागातील कार्यकर्त्यांची गळचेपी केली जात आहे. दबाव टाकण्याचा प्रयत्न केला जात आहे. शहरातील स्थानिक नेतृत्वाच्या मनमानी कारभाराला व होत असलेल्या अन्यायाला कंटाळून पगार यांनी पक्ष सदस्यत्व तसेच विभाग प्रमुख पदाचा राजीनामा दिला असल्याचे सांगितले.

## सागरी जैवविविधतेच्या संवर्धनासाठी 'सागर महोत्सव'

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई** : आसामंत बेनेव्होलन्स फाउंडेशनतर्फे 15 ते 18 जानेवारी 2026 या कालावधीत 'सागर महोत्सव – SEAVERSE 2026' या चारदिवसीय महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास पर्यटन संचालनालयामार्फत प्रायोजकत्व देण्यात आले आहे. हा चार दिवस चालणारा कार्यक्रम रत्नागिरीतील विविध पर्यटन स्थळांवर आयोजित करण्यात आला आहे. अशी माहिती कोकण विभागीय पर्यटन कार्यालयामार्फत देण्यात आली आहे. 'सागर महोत्सव – SEAVERSE 2026' साजरा करण्यासाठी चार दिवसांच्या कार्यक्रमांचे नियोजन पुढील प्रमाणे राहील दि. १५ जानेवारी २०२६ रोजी अभ्यासफेऱ्यांद्वारे महोत्सवाची सुरुवात होणार असून, पहिल्या दिवशी सकाळी खारपुटी जंगलाची अभ्यासफेरी आयोजित करण्यात आली आहे. या फेरीत तज्ज्ञ हेमंत कारखानीस व शांभवी चव्हाण यांच्या उपस्थितीत खारपुटी व किनारी परिसंस्थेचा सखोल अभ्यास करण्यात येणार आहे. यानंतर दोन बोटीतून फेऱ्या घेतल्या जाणार असून प्रत्येक फेरीस सुमारे 90 मिनिटांचा कालावधी लागणार आहे. या उपक्रमासाठी प्रथम येणाऱ्यास प्राधान्य देण्यात येणार आहे.सायंकाळी खडकाळ किनारा अभ्यासफेरीचे आयोजन करण्यात आले असून, प्रदीप पाताडे व डॉ. अमृता भावे यांच्या मार्गदर्शनाखाली भाटकरवाडा परिसरातील शैवाळ व खडकाळ किनारी आढळणाऱ्या सजीवांचा अभ्यास करण्यात येणार आहे.दि. 16 जानेवारी 2026 रोजी सकाळी 9 वाजता महोत्सवाचा उद्घाटन सोहळा पार पडणार असून, मुख्य अतिथी म्हणून डॉ. शैलेश नायक यांच्या उपस्थितीत कार्यक्रमास सुरुवात होईल.

# भिवंडी पालिकेचा निवडणूक हरकतींसाठी टोल फ्री क्रमांक व संकेतस्थळ उपलब्ध

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : भिवंडी निजामपूर शहर महानगर पालिकेच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर आता प्रचार चे वारे जोमामध्ये वाहू लागले असून अनेक ठिकाणी वादविवाद व पोलीस ठाण्यात तक्रार दाखल होत आहेत. त्यामुळे शहरातील वातावरण सध्या काही प्रमाणात तणावपूर्ण चर्चेत असुन रात्रीच्या वेळी सार्वजनिक रस्त्यावर व बियरबार,हॉटेल व धाब्यावर मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे.त्यामुळे शहरात अनुचित प्रकार घडू नये यासाठी भिवंडी पोलिस उपआयुक्ताचे आदेशानुसार पोलीस ठाण्यातील बीट निरीक्षक कर्मचाऱ्यांची विविध प्रभागात गस्त वाढवली आहे. असे असतानाच आता राज्य निवडणूक आयोगाच्या सुचनेनुसार भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने आचारसंहिता भंग होऊ नये




याकरिता निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयनिहाय आचारसंहिता पथकाची स्थापना करण्यात आली आहे. त्याचसोबत महानगर पालिकेने मुख्यालयामध्ये देखील एक टोल फ्री क्रमांक 18002331105 कार्यान्वित केला असून, ज्या नागरीकांना निवडणूकविषयक तक्रारी दाखल करावयाच्या असतील त्यांनी वरील क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन केले आहे. तसेच bncmc.ele.mcc@gmail.com या ई-मेलवर देखील तक्रारी दाखल करता येतील व महानगर पालिकचे निवडणूक संकेतस्थळ https://election.bncmc.gov.in/contact या संकेतस्थळावर देखील तक्रार दाखल करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.अशी माहिती महाप्रशासनामार्फत देण्यात आली आहे. नागरीकांना जर काही निवडणूक विषयक तक्रारी असल्यास वरील पर्यायांचा वापर करावा असे आवाहन पालिका आयुक्त प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

भिवंडी शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात सार्वत्रिक निवडणुकीसाठी विविध निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात मोठ्या उत्साहामध्ये उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले आहेत प्रत्येक वार्डामध्ये उमेदवारी अर्ज दाखल होत असताना प्रतिस्पर्धी उमेदवारांमध्ये शाब्दिक वादविवाद व शिवीगाळ करण्याचे प्रकार होत असल्यामुळे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल होत आहे त्यामुळे पोलीस दल सुद्धा सक्रिय झाले असून अनुचित प्रकार केल्यास तात्काळ गुन्हे दाखल करून अटक करण्याची प्रक्रिया केली जाईल अशी माहिती भिवंडी पोलीस उपायुक्त शशिकांत बोराटे यांनी दिली शहरातील कायद्याचा कायदा व सुव्यवस्था शांतता अबाधित राखण्यासाठी नागरिकांनी पोलिसांना सहकार्य करावे असे आवाहनही त्यांनी केले आहे. तसेच निवडणूक विषयी काही तक्रारी असतील तर त्यांनी महापालिकेच्या संकेतस्थळावर जाऊन आपल्या तक्रारी नोंदवाव्यात असेही त्यांनी आवाहन केले आहे.

## जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांच्या हस्ते 'आपलं पर्यावरण' जंगल विशेष दिनदर्शिकेचे प्रकाशन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** "पर्यावरण दक्षता मंडळ" ही संस्था गेली 26 वर्षे पर्यावरण शिक्षण, संवर्धन व जनजागृती या क्षेत्रात ठाणे व जवळपासच्या परिसरांत कार्यरत आहे. संस्थेच्या 'आपलं पर्यावरण' - पर्यावरण शिक्षण घरोघरी या मासिकांतर्गत गेली 4 वर्षे पर्यावरणीय दिनदर्शिका प्रकाशित केली जाते. 2026ची दिनदर्शिका भारताच्या अप्रतिम, वैविध्यपूर्ण आणि मंत्रमुग्ध करणाऱ्या वनसंपत्तीविषयी आहे. "आपलं पर्यावरण दिनदर्शिका 2026" चे प्रकाशन आज गुरुवार, दि.1 जानेवारी 2026 रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे येथे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांच्या हस्ते संपन्न झाले. याप्रसंगी "आपलं पर्यावरण" मासिकाचे संपादक प्रा.विद्याधर वालावलकर व कार्यकारी संपादक सुरभी ठोसर हे उपस्थित होते.

पर्यावरण दक्षता मंडळाच्या देवराई, निसर्गायण मामणोली, निसर्गायण टिटवाळा तसेच ग्रीन शॉपी या प्रकल्पांविषयीही यावेळी चर्चा झाली. ही दिनदर्शिका केवळ तारखांची मांडणी नाही, ती आपल्या देशातील अविश्वसनीय जंगलांचा, तेथील जैवविविधतेचा आणि पृथ्वीच्या भविष्यात त्यांच्या निर्णायक भूमिकेचा अनुभव देणारी एक जिवंत सफर आहे. प्रत्येक महिन्यावर एक नवा प्रदेश, एक नवा रंग, एक नवी कथा आहे. निसर्गाची भाषा समजून घेण्यासाठी, जंगलांशी नाते बांधण्यासाठी आणि पर्यावरण जागरूकतेची नवी दृष्टी देण्यासाठी ही दिनदर्शिका तुमची साथीदार ठरेल. तुम्ही एक प्रत घरी ठेवा, तुमच्या प्रिय व्यक्तींना भेट द्या किंवा शाळा-महाविद्यालयांना दान करून विद्यार्थ्यांच्या मनात पर्यावरणाबद्दलची संवेदना रुजवा, असे आवाहन पर्यावरण दक्षता मंडळाने यावेळी केले आहे.

## मतदान जनजागृती करत सम्राट अशोक विद्यालयात नववर्षाचे स्वागत



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण डोंबिवली महानगरपालिकेची निवडणूक येत्या 15 जानेवारीला होत असून या निवडणुकीत सर्व मतदारांनी मतदान करा असा संदेश देत सम्राट अशोक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी नवीन वर्षाचे स्वागत हवेत फुगे सोडत केले आणि मतदान जनजागृती केली असल्याची माहिती मुख्याध्यापक गुलाबराव पाटील यांनी दिली.






# उल्हासनगर येथे भव्य 'आनंदम २.०' ध्यान शिबीर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : आजचे सर्वसामान्य जीवनमान पहाता मनुष्य एक चाकोरीबद्ध जीवन जगताना दिसतो आहे. आणी यात त्याचे अंत:मन एकाकी पडत चालले आहे. बाहेरून आपण स्वत:ला आनंदी मानतो पण, पूर्ण शरीरावर, कुटुंबावर व सामाजिक स्वास्थ्यावर परीणाम करणारे आपले मन संकुचित होत चालले आहे. तेव्हा या मनाला शांत व सुसंस्कृत करण्यासाठी ध्यानयोगाचा फार मोठा उपयोग होतो.आणी हाच सामाजिक बांधिलकीचा धागा पकडुन स्वस्थ भारत योग केंद्र आणी योग



विद्या गुरुकुल, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने उल्हासनगर येथे पाच दिवसीय भव्य ध्यानयोग शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

जेव्हा अमेरिकेतील १९९३ मध्ये न्युयॉर्क येथे नैराश्याचे आणी गुन्ह्यांचे प्रमाण वाढले होते तेव्हा तेथील सरकारने ध्यानयोगाचा प्रयोग नागरिकांवर करुन पाहीला. व त्यासाठी महाऋषी योगी महेश यांना भारतातुन बोलावण्यात आले होते. तेथील नागरिकांनी ध्यानयोग शिबिर पुर्ण केले आणी आश्चर्य म्हणजे तेथील गुन्ह्यांचे प्रमाण वर्षभरात २३%ने कमी झाले. हाच प्रयोग 'महाऋषी इफेक्ट 'म्हणून सर्वज्ञात आहे.

तर असा हा अंत:मनाचा प्रवास घडविणारे 'आनंdam २.०' हे ध्यानयोग शिबिर आपल्या देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते सर्वात पहीला योगाचार्य पुरस्कार मिळविलेले योगाचार्य डॉ.विश्वासराव मंडलिक गुरुजी हे घेणार आहेत. शनिवार दि. ३ जानेवारी २०२६ ते बुधवार दि. ७ जानेवारी २०२६ असे सलग पाच दिवस हे शिबिर होणार असुन मयुर लॉन्स, उल्हासनगर येथील भव्य प्रांगणात याचे आयोजन करण्यात आले आहे. सदर ध्यानयोग शिबिर नागरिकांना आपल्या इच्छेनुसार सकाळ वा संध्याकाळ असे शुल्क भरून करता येणार आहे. तेव्हा या अभूतपूर्व अशा ध्यानयोग शिबिराचा नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन स्वस्थ भारत योग केंद्राचे संस्थापक अध्यक्ष प्रदीप होतवानी यानीं केले आहे व अधिक माहीतीसाठी संस्थेच्या ९१३२३२६९६९ व ९८२२३७१६९० या संपर्क क्रमांकांवर माहीती घेण्याचे आवाहन केले आहे.

## जिल्हा कारागृहातील प्रशिक्षित बंद्यांना जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**रायगड :** कारागृहातील बंदी सुटून गेल्यानंतर गुन्हेगारी क्षेत्रातून बाहेर पडून त्यांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी, त्यांचा व त्यांचे कुटुंबाचा उदरनिर्वाह व्हावा, याउद्देशाने अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे व विषेश कारागृह महानिरीक्षक, दक्षिण विभाग, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली जास्तीत जास्त बंद्यांना व्यावसायिक प्रशिक्षण देण्यासाठी कारागृह प्रशासनाकडून प्रयत्न करण्यात येत आहे. या प्रयत्नांचा एक भाग म्हणून अलिबाग जिल्हा कारागृहातील बंद्यांकरीता कौशल्य विकास कार्यक्रम (DPC २०२५-२६), जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अलिबाग, जिल्हा उद्योग केंद्र, अलिबाग यांच्यामार्फत पुरुष बंद्यांना दुचाकी मोटार सायकल दुरुस्ती व महिला बंद्यांकरीता ब्युटिपार्लर बेसीक व ॲडव्हांन्स कोर्सचे प्रशिक्षण पूर्ण केलेल्या अलिबाग जिल्हा कारागृहातील बंद्यांना जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्याहस्ते प्रमाणपत्र वितरण करण्यात आले.

यावेळी सचिव जिल्हा विधीसेवा प्राधिकरण,रायगड-अलिबाग श्रीम. तेजस्विनी निराळे, जिल्हा कौशल्य उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त अमिता पवार, अधीक्षक,अलिबाग जिल्हा कारागृह विशाल बांदल यांच्यासह जिल्हा उद्योग केंद्रांचे प्रतिनिधी, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी किशन जावळे म्हणाले की, कारागृह विभागाच्या "सुधारणा व पुनर्वसन" या ब्रिद वाक्याचा उद्देश साध्य होण्याच्या दृष्टीने किमान कौशल्य विकास डिपीसी-२०२५-२६ अंतर्गत अलिबाग जिल्हा कारागृहातील बंद्यांकरीता कौशल्य प्रशिक्षण देण्यात येत आहे. कारागृहातील बंदी सुटून गेल्यानंतर गुन्हेगारी क्षेत्रातून बाहेर पडून रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी. बंद्यांचा, स्वत:चा व त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह व्हावा या उद्देशाने जास्तीत जास्त बंद्यांना व्यावसायिक प्रशिक्षण देण्याचा कारागृह प्रशासनाकडून प्रयत्न करण्यात येत आहे. ग्रामीण प्रगती फाऊंडेशन व जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र रायगड-अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने बंद्यांकरीता हेल्थ केअर सेक्टर अंतर्गत Home Health Trainee या कोर्ससाठी बंद्यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या प्रशिक्षणातून बंद्यानी चांगले प्रशिक्षण घेवून आपले जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न करावा. तसेच प्रत्येक बंद्यांनी आपल्या आरोग्याच्या सोयी-सुविधांसाठी आयुष्यमान कार्ड काढून त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. ज्या बंद्यांना प्रमाणपत्र मिळाले नाही त्यांनी प्रशिक्षणासाठी आपला सहभाग नोंदवून प्रशिक्षण घ्यावे.

सचिव जिल्हा विधीसेवा प्राधिकरण,रायगड-अलिबाग श्रीम. तेजस्विनी निराळे यांनी सांगितले की, नियमित जीवन जगताना कायदा खूप महत्वाचा असतो. ज्या बंद्यांनी प्रशिक्षण पूर्ण करुन प्रमाणपत्र मिळविले आहे त्यांची प्रेरणा घेवून इतर जास्तीत जास्त बंद्यांनी घेवून हे प्रशिक्षण पूर्ण करावे. बंद्यांनी जागरुकतेने आपल्याला असलेल्या सोयी-सुविधा मिळविण्याचा प्रयत्न करावा. रोजगाराच्या वेगवेगळया संधी उपलब्ध असल्याने हे प्रशिक्षण बंद्यांनी घेतल्यास बंदी आत्मनिर्भर होवून त्यांना रोजगार उपलब्ध होईल.







Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024